वर्ष- १२ ■ अंक- ३७ ■ मुंबई, मंगळवार,२८ जुलै २०२६ ते ०३ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2

राजर्षी शाहू महाराजांनी सव्वाशे वर्षांपूर्वी दिलेलं 50 टक्के आरक्षण नेमकं कसं होतं?

3 → व्यवस्थेच्या विफलतेचा आक्रोश

रक्त केंद्रांवर आरोग्य विभागाची नजर ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

आता गुन्हेगारांची खैर नाही

वाहतूक पोलिसांना आता 'सर्व्हिस गन' बाळगणे अनिवार्य, विश्वास नांगरे पाटील यांचे थेट आदेश



नागपूर। शहरातील वाहतूक पोलिसांच्या सुरक्षेला प्राधान्य देत पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शहरातील विविध चौकांमध्ये नाकाबंदी, विशेष तपासणी मोहीम तसेच वाहतूक नियंत्रणाची जबाबदारी पार पाडणाऱ्या वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांनी आणि अंमलदारांनी आता ड्युटीदरम्यान ह्यासर्व्हिस गनह्ण बाळगणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश गुरुवारी (ता.१६) वॉकी-टॉकीद्वारे देण्यात आले. शहरात नाकाबंदीवेळी गुन्हेगार, संशयित आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करताना वाहतूक पोलिसांना अनेकदा प्रतिकार, धक्काबुक्की किंवा जिवाला धोका निर्माण होण्याच्या घटना घडतात. ही बाब लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांना संरक्षण मिळावे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देता यावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. यापूर्वी दोन दिवसांपूर्वीच पोलिस आयुक्तांनी वाहतूक शाखेतील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ड्युटीदरम्यान 'नीट अँड क्लीन' राहण्याचे निर्देश दिले होते. स्वच्छ गणवेश, शिस्तबद्ध वर्तन आणि नागरिकांशी सौजन्यापूर्ण संवाद यावर विशेष भर देण्यास सांगितले होते. आता त्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने 'सर्व्हिस गन' बाळगण्याचा निर्णय झाल्याने वाहतूक शाखेच्या कामकाजात आणखी शिस्त आणि सज्जता येणार असल्याचे मानले जात आहे. शहरातील प्रमुख चौक, नाकाबंदी आणि विशेष बंदोबस्तादरम्यान या आदेशाची तातडीने अंमलबजावणी केली जाणार असून, कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

एसीपी, डीसीपींनाही गन बाळगण्याचे आदेश

आज वाहतूक पोलिसांना सर्व्हिस रिव्हॉल्व्हर ठेवण्याचे आदेश दिले असताना, दोन दिवसांपूर्वी पोलिस आयुक्तांनी शहरातील सर्वच पोलिस आयुक्त, साहाय्यक पोलिस आयुक्त आणि सर्वच वरिष्ठ पोलिस निरीक्षकांनाही सर्व्हिस रिव्हॉल्व्हर ठेवण्याचे आदेश दिले आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये पोलिसांवर हल्ले वाढले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर पोलिस आयुक्तांनी हे आदेश काढले असल्याचे समजते.

शहरात दररोज ५२० वाहतूक पोलिस रस्त्यावर

नागपूर शहरात प्रत्यक्ष रस्त्यावर सुमारे ५२० वाहतूक पोलिस गस्त, वाहतूक नियंत्रण आणि अंमलबजावणीसाठी उपलब्ध असतात. शहरातील मंजूर पदसंख्या ८४३ असली तरी साप्ताहिक सुट्ट्या, रजा, वैद्यकीय कारणे, बंदोबस्त आणि व्हीआयपी ड्युटीमुळे दररोज प्रत्यक्ष रस्त्यावर तैनात असलेली संख्या सुमारे ५२० पर्यंत मर्यादित राहते. शहरात २० लाखांहून अधिक वाहने आणि १७१ सिग्नलयुक्त चौक आहेत, हे विशेष.

गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करण्याचा उद्देश

शहरातील विविध चौकांमध्ये होणारी नाकाबंदी, विशेष तपासणी मोहीम आणि ड्रंक अँड ड्राईव्ह कारवाई दरम्यान वाहतूक पोलिसांना अनेकदा स्थानिक गुन्हेगार, संशयित किंवा नियम मोडणाऱ्या लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. अनेकदा पोलिसांवर जीवघेणे हल्ले किंवा धक्काबुक्कीच्या घटना घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी स्वतःच्या आत्मसंरक्षणासाठी आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने प्रतिसाद देण्यासाठी हे शस्त्र बाळगणे अनिवार्य केले आहे. पोलिसांना आता काठीसोबतच शस्त्र सोबत ठेवावे लागणार आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही 'गन' बाळगण्याचे आदेश

केवळ रस्त्यावरील वाहतूक पोलिसांनाच नव्हे, तर नागपूर पोलीस दलातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस आयुक्त आणि पोलीस उपायुक्त यांनाही त्यांची अधिकृत सर्व्हिस रिव्हॉल्व्हर किंवा पिस्तूल नेहमी सोबत ठेवण्याचे आदेश दोन दिवसांपूर्वीच देण्यात आले आहेत. पोलिसांची सुरक्षितता वाढवणे आणि गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करणे हा या आदेशामागील मुख्य हेतू आहे.

दोन दिवसांपूर्वीच दिले होते 'नीट अँड क्लीन' राहण्याचे निर्देश

विशेष म्हणजे, दोन दिवसांपूर्वीच पोलीस आयुक्तांनी वाहतूक शाखेतील सर्व कर्मचाऱ्यांना ड्युटीदरम्यान अत्यंत शिस्तबद्ध राहण्याचे आदेश दिले होते. स्वच्छ गणवेश, उत्तम वर्तन आणि नागरिकांशी सौजन्यपूर्ण संवाद साधण्यावर त्यांनी भर दिला होता. आता शिस्तीनंतर थेट सुरक्षेसाठी शस्त्र बाळगण्याचा निर्णय झाल्याने नागपूर पोलिसांची सज्जता आणखी वाढणार आहे.



५३ गुन्ह्यांतील सराईत घरफोडे अटकेत; भिवंडी गुन्हे शाखेने ७ घरफोड्यांचा उलगडा, १७.२७ लाखांचे सोन्याचे दागिने जप्त



भिवंडी । भिवंडी गुन्हे शाखा, घटक-२ ने घरफोडी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांना अटक करत सात घरफोडीच्या गुन्ह्यांचा उलगडा केला आहे. या कारवाईत आरोपींकडून सुमारे १७ लाख २७ हजार रुपये किमतीचे २९८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पोलीस तपासात अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असल्याचे समोर आले आहे. त्यांच्याविरुद्ध ठाणे शहर, मुंबई, नवी मुंबई, ठाणे ग्रामीण तसेच मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत मिळून मालमत्तेविरुद्धचे तब्बल ५३ गुन्हे दाखल असल्याची माहिती तपासातून उघड झाली. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या सोन्याच्या दागिन्यांमुळे सात घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले असून, या कारवाईमुळे परिसरातील घरफोडीच्या घटनांवर आळा बसण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. भिवंडी गुन्हे शाखा, घटक-२ च्या या उल्लेखनीय कारवाईबद्दल वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पथकाचे कौतुक केले आहे. नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी आणि सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यासाठी ठाणे पोलीस कटिबद्ध असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले.

नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठाणे पोलीस सदैव तत्पर!

हिल लाईन पोलिसांची तत्परता; जंगलात अडकलेल्या ३ तरुणांची सुखरूप सुटका!



ठाणे। ट्रेकिंग दरम्यान हे ३ तरुण अंबरनाथ जवळील 'दादी माँ डोंगर' परिसरातील घनदाट जंगलात मार्ग भटकले होते. संध्याकाळनंतर वाढलेला अंधार, मुसळधार पाऊस आणि खडतर दुर्गम वाटा यामुळे त्यांच्यावर जीव धोक्यात येण्याची वेळ आली होती. दादी माँ डोंगर परिसरात ट्रेकिंगदरम्यान रस्ता चुकलेल्या ३ तरुणांचा डायल 112 वर कॉल प्राप्त होताच हिल लाईन पोलिसांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले. मुसळधार पाऊस, अंधार आणि दुर्गम जंगल परिसरातील आव्हानांवर मात करत पोलीस पथक, अग्निशमन दल व स्थानिक युवकांच्या मदतीने तब्बल ८-९ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर तिन्ही तरुणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले.

कल्याणात प्रियकराची हत्या; मृतदेह गोणीत भरून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न, महिलेचा शोध

कल्याण । कल्याणमधील मलंग रोड परिसरातील नीलकंठ सोसायटीमधील एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका महिलेने प्रियकराची हत्या करून त्याचा मृतदेह पोत्यात भरून बाथरूममध्ये लपवल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात तरुणाची हत्या केल्यानंतर आरोपी महिलेने मृतदेह लवकर कुजावा व रक्तासह इतर महत्त्वाचे पुरावे नष्ट व्हावे म्हणून बाथरूमचा नळ सलग सुरू ठेवला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मलंग रोड परिसरातील नीलकंठ सोसायटीमध्ये घडलेल्या या घटनेनं संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून फ्लॅट क्रमांक १०४ मधून पाणी बाहेर येत असल्याची तक्रार इमारतीतील रहिवाशांनी घरमालक अजय पाटील यांच्याकडे केली होती. यानंतर पाटील यांनी भाडेकरूंसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना प्रतिसाद मिळत नसल्यामुळे संशय अधिक वाढला. घरमालक अजय पाटील यांना संशयित महिलेकडून नुकताच एक व्हॉइस मेसेज प्राप्त झाला. या मेसेजमध्ये सदर महिलेने आपल्या प्रियकराचा खून केल्याची माहिती देत मृतदेह बाथरूममध्ये असल्याचं सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे. हा व्हॉइस मेसेज प्राप्त होताच घरमालकाने तातडीने मानपाडा पोलीस ठाण्यात धाव घेत पोलिसांना माहिती दिली. या तक्रारीनंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात मृताच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करण्यात आल्याचं आढळून आळं आहे. तसंच बाथमरूमचा नळ सुरू असल्याचं दिसून आलं. रक्ताचे डाग आणि इतर पुरावे नष्ट करण्यासाठीच महिलेने बाथरूमचा नळ सुरू ठेवण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

ठाण्यात शाळा, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांजवळील अनधिकृत पानटपऱ्यांवर महापालिकेचा हातोडा; विशेष मोहिमेला प्रारंभ

ठाणे। शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, धार्मिक स्थळे आणि इतर सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरातील अनधिकृत पानटपऱ्या, हातगाड्या, चिकन-मटण दुकाने, चायनीज स्टॉल्स आणि तत्सम अतिक्रमणांविरोधात ठाणे महानगरपालिकेने विशेष मोहीम सुरू केली आहे. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी वर्तकनगर आणि मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कारवाई करत अनेक अनधिकृत अतिक्रमणे हटविण्यात आली. महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निदेर्शानुसार अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका परिषा सरनाईक यांनी सार्वजनिक ठिकाणांच्या परिसरात वाढलेल्या अनधिकृत अतिक्रमणांचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर आयुक्तांनी तातडीने कारवाईचे आश्वासन दिले होते. या मोहिमेअंतर्गत मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात ११ अनधिकृत पानटपऱ्या, ८ हातगाड्या आणि ४ स्टील बाकडे हटविण्यात आले. तर वर्तकनगर प्रभाग समिती क्षेत्रात १० अनधिकृत पानटपऱ्यांवर कारवाई करून परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला. शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि धार्मिक स्थळांच्या परिसरातील सुरक्षितता वाढविणे, वाहतुकीतील अडथळे दूर करणे, पादचारी मार्ग मोकळे ठेवणे तसेच स्वच्छता आणि सार्वजनिक सुव्यवस्था कायम राखणे, हा या विशेष मोहिमेचा प्रमुख उद्देश असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले. महापालिकेने ही कारवाई केवळ दोन प्रभाग समित्यांपुरती मर्यादित न ठेवता शहरातील सर्व प्रभाग समिती क्षेत्रांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्याचा निर्णय घेतला आहे. अनधिकृत अतिक्रमणांविरोधातील मोहीम सातत्याने सुरू राहणार असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमासह इतर संबंधित कायद्यांनुसार कठोर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. उपआयुक्त (अतिक्रमण) जितेंद्र निकम यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात येत असून परिमंडळ ३ चे उपआयुक्त दिनेश तायडे, परिमंडळ १ चे उपआयुक्त दीपक झिंजाड, वर्तकनगर प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त गणेश चौधरी आणि मुंब्रा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त विजय कवळे यांच्या समन्वयातून कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभाग, प्रभाग समितीचे अधिकारी-कर्मचारी, पोलीस प्रशासन आणि संबंधित विभागांच्या संयुक्त पथकाने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली. महापालिकेने नागरिकांना विनापरवानगी अतिक्रमणे उभारू नयेत तसेच शहर स्वच्छ, सुरक्षित आणि अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.



पुण्यात तरुणाची हत्या... मृताच्या आईने भर रस्त्यात पोलिसांसमोरच आरोपींना चपलेनं मारले

पुणे। पुणे पुन्हा एकदा हत्याकांडाने हादरले आहे. पुण्यातील कात्रजमध्ये 17 वर्षीय तरुणाची कोयत्याने निर्घृण हत्या करण्यात आली. पोलिसांनी आरोपींना अटक करत त्यांची भर पावसात धिंड काढली. यावेळी मृताच्या आईने आरोपींना भर रस्त्यात चपलेनं मारत संताप व्यक्त केला.

कात्रजमध्ये झालेल्या हत्याकांडामुळे पुण्यात खळबळ माजली. जुन्या वादातून 7 जणांकडून धारदार शस्त्रांनी हल्ला करत तरुणाची हत्या करण्यात आली. हत्या करणारे सर्व आरोपी अल्पवयीन असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. भारती विद्यापीठ पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे.

अटक केलेल्या आरोपींपैकी तिघांची भरपावसात व्हॅनला बांधून पोलिसांनी धिंड काढली. दरम्यान, आरोपींना दाखवण्यासाठी नातेवाईकांची पोलिस ठाण्याबाहेर मागणी केली होती. नातेवाईकांनी यावेळी गोंधळ घालत आरोपींविरोधात संताप व्यक्त केला. मृताच्या आईने धिंड काढलेल्या आरोपींना भर रस्त्यात चपलेनं मारून आपला संताप व्यक्त केला. मोबाईल दुरुस्त करण्यासाठी मित्रासोबत गेला असताना आरोपींकडून हल्ला करण्यात आला. या प्रकरणी सात जणांविरोधात भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुणे पोलिसांनी या आरोपींची दहशत मोडून काढण्यासाठी या आरोपींची धिंड काढली होती.

अहिल्यानगरला स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई

अहिल्यानगरला स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई केली आहे. दोन संशयितांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातील पाच गावठी अग्निशस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. यासोबतच दोघांकडून ४० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल आणि ८ लाख रुपये किमतीची स्कोडा कंपनीची कार असा एकूण १० लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपींकडे ही अग्निशस्त्रे कोठून आली आणि ती कुणाला विक्री केली जाणार होती, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

पोलीस बातमी पत्र

आक्रोश

२

मुंबई, मंगळवार,२८ जुलै २०२६ ते ०३ ऑगस्ट २०२६

राजर्षी शाहू महाराजांनी सव्वाशे वर्षांपूर्वी दिलेलं 50 टक्के आरक्षण नेमकं कसं होतं?



'राज्याची अधिकारसूत्रे हाती आली तेव्हा सर्वत्र एकाच सुशिक्षित जातीचे वर्चस्व होते. ऑफिसातून मागासलेल्या जातीचा एकही नोकर दिसत नव्हता. म्हणून त्यांचा दर्जा वाढवण्याकरिता मागासलेल्या सर्व जातींच्या लोकांना नोकरी देण्याचे धोरण मला ठेवावे लागले.' राजर्षी शाहू महाराजांनी 16 एप्रिल 1920 रोजी नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या निराश्रित सोमवंशीय समाजाच्या सभेत केलेल्या भाषणातील हा अंश.

शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्गाला जवळपास सव्वाशे वर्षांपूर्वी म्हणजे 1902 मध्ये नोकऱ्यांमध्ये 50 टक्के आरक्षण जाहीर केलं होतं. देशातला तो आरक्षणाचा पहिला निर्णय. त्याबाबतच भाषणात त्यांनी ही भूमिका मांडली होती. आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रातलं राजकारण पेटलं आहे. वेगवेगळे वाद समोर येत आहेत. पण शाहू महाराजांनी दिलेलं आरक्षण कसं होतं, त्यामागची भूमिका आणि इतर पैलूंची माहिती आपण घेणार आहोत.

छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक, शैक्षणिक विचारांनी महाराष्ट्राला कशी दिशा दिली? शाहू महाराजांनी 26 जुलै 1902 रोजी करवीर सरकार गॅझेटच्या माध्यमातून हा नोकऱ्यांतील 50 टक्के आरक्षणाचा निर्णय जाहीर केला होता. त्यांच्या जयंतीच्या निमित्तानं आपण या आरक्षणाच्या निर्णयाबाबत जाणून घेणार आहोत.

डॉ.जयसिंगराव पवार यांच्या राजर्षी शाहू छत्रपती जीवन आणि कार्य पुस्तकातील नोंदीनुसार, शाहू महाराज 1902 मध्ये सातव्या एडवर्ड बादशहाच्या राज्यरोहण समारंभासाठी लंडनला गेले होते. त्यावेळी ते युरोपच्या दौऱ्यावर असतानाच कोल्हापुरात 26 जुलैला हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला होता.

डॉ.मंजूश्री पवार या इतिहास संशोधक आहे. त्यांनी शाहू महाराजांसंदर्भात डॉ. जयसिंगराव पवार यांच्या साथीनं शाहू महाराजांवरील पंचखंडात्मक स्मारक ग्रंथाचं संपादन केलं आहे. शाहू महाराजांच्या संपूर्ण जीवनकायार्चा आढवा त्यात घेण्यात आला आहे. डॉ. मंजूश्री पवार यांनी महाराजांच्या आरक्षणाच्या भूमिकेविषयी बोलताना म्हटलं की, समाजातील काही विशिष्ट वर्गाशिवाय मागास राहिलेल्या समाजाला बरोबरीनं आणून बसवण्यासाठी शाहू महाराजांनी वेगवेगळे तोडगे काढले. त्याचाच एक भाग म्हणजे आरक्षण होता. समान संधीच्या विचारातून महाराजांना हा तोडगा महत्त्वाचा वाटला. शाहू महाराजांची भाषणं, पत्रं किंवा इतर साहित्यांमध्ये बहुजनांच्या शिक्षणाविषयी त्यांचा असलेला आग्रह वारंवार पाहायला मिळतो. इतिहासाचे अभ्यासक इंद्रजित सावंत यांच्या मते, शिक्षणासाठी प्रेरणा मिळावी हाच, त्यांचा नोकरीत आरक्षण देण्यामागचा विचार प्रमुख विचार होता.

सावंत यांच्या मते, शाहू महाराजांच्या काळात जवळपास 99 टक्के बहुजन समाजाकडे शिक्षण नव्हतं. त्यांना अक्षरओळखही नव्हती. पण शिक्षणानेच मानवाची आर्थिक, सामाजिक आणि मानसिक प्रगती होऊ शकते, हे महाराजांच्या लक्षात आलं होतं. तसंच शाहू महाराजांकडं कारभार आला तेव्हा 99 टक्के व्यवस्था ही उच्चवणीर्यांच्या हाती होती. त्यामुळं हे प्राबल्य कमी करण्यसाठी बहुजनांना शिक्षण दिलं पाहिजे, हे महाराजांच्या लक्षात आलं होतं, असंही ते सांगतात.

या कारणानेच लोकांना शिक्षण द्यायचं असं महाराजांनी ठरवलं. पण लोक शिक्षण का घेतील? हाही प्रश्न तेव्हा होता. त्याचं उत्तर म्हणजे, नोकरी मिळवायची असेल तर शिक्षण गरजेचं असतं. त्यामुळं नोकरीत आरक्षण असेल तर त्यासाठी शिक्षण घेण्याकडं ओढा वाढेल या विचारातून आरक्षणाचा विचार पुढं आला, असं मत इंद्रजित सावंत व्यक्त करतात.

या विचारातून शाहू महाराजांनी नोकरीत 50 टक्के आरक्षणाचा निर्णय जाहीर केला. पुढं हेच आरक्षणाचं धोरण बाबासाहेबांनी घटनेच्या माध्यमातून राबवलं, असं सावंत सांगतात.



शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यात काही वर्षांचंच पण अगदी घट्ट नातं होतं आणि ते नातं विचारांवर आधारित होतं, असंही सावंत यांनी सांगितलं.

असा होता आरक्षणाचा जाहीरनामा

डॉ. जयसिंगराव पवार यांनी शाहू महाराजांवर विस्तृत असं संशोधन आणि लेखन केल आहे. त्यांच्या 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन आणि कार्य' या पुस्तकामध्ये आरक्षणाच्या या जाहीरनाम्याबाबत माहिती देण्यात आली आहे. तसंच या जाहीरनाम्याच्या उपलब्ध असलेल्या प्रतिंमध्येही याबाबतचा मजकूर पाहायला मिळतो. तो खाली देत आहोत. सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णांच्या प्रजेस शिक्षण देण्याबाबत व त्यांस उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितींत सदरहू प्रयत्नास जितके यावे तितके यश आलेले नाही. हे पाहून सरकारांस पार दिलगिरी वाटते. ह्या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांती सरकारांनी असे ठरविले आहे की, यशाच्या ह्या अभावाचे खरे कारण उंच प्रतिच्या शिक्षणास मोबदले पुरेसे विपूल दिले जात नाही, हे होय. ह्या गोष्टीस काही अंशी तोड काढण्याकरिता व उच प्रतीचे शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनांपैकी मागासलेल्या वर्णांनी अभ्यास करावे, महणून उत्तेजन दाखल आपल्या संस्थानांच्या नोकरीचा आजपर्यंत चालू असल्यापेक्षा बराच मोठा भाग त्यांच्याकरिता निराळा राखून ठेवणे हे इष्ट होईल, असे सरकारांनी ठरविले आहे.

ह्या रीतीस अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करितात की, हा हुकूम पोहोचल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागांपैकी शेकडा पन्नास जागा मागासलेल्या लोकांस भराव्या. ज्या ऑफिसांमध्ये मागासलेल्या वर्गांच्या अमलादारांते प्रमाण सध्या शेकडा पन्नासपेक्षा कमी असेल, तर पुढची नेमणूक ह्या वणार्तील व्यक्तीची करावी.

ह्या हुकुमाच्या प्रसिद्धी नंतर केलेल्या सर्व नेमणुकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुक्यांनी सरकारांकडे पाठवावे.

सूचना- मागासलेल्या वर्णांचा अर्थ ब्राह्मण, परभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ण खेरीज सर्व वर्ण असा समजावा.₹

तर नोकऱ्यांतील आरक्षणासाठी त्यावेळी अशाप्रकारचा जाहीरनामा काढण्यात आला होता. त्यावरून आरक्षण, त्यामागची भूमिका आणि अंमलबजावणी याचा उल्लेख स्पष्टपणे आढळलो.

शिक्षणासाठीचे विशेष प्रयत्न


शिक्षणाचं हेच महत्त्वं ओळखून शाहू महाराजांनी या दृष्टीनं केलेल्या कायार्बाबत महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा यामध्येही सविस्तर उल्लेख करण्यात आला आहे. समाजातील वरच्या वगार्ला शिकवलं की ते त्यांच्यापेक्षा खालच्या वगार्तील लोकांना शिकवतील हा ब्रिटिशांचा सिद्धांत होता. पण त्यावर शाहूंचा विश्वास नव्हता. त्यामुळं प्रजेला किमान प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले.

30 सप्टेंबर 1917 रोजी कोल्हापूर संस्थानातर्फे मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. शाहू महाराजांनी यासाठी खास विभागही सुरू केला आणि स्वतः त्यावर नजर ठेवली.

जातीय विषमता नष्ट होण्यासाठी प्रत्येक जात आर्थिकदृष्ट्या सबल व्हायला हवी आणि ती आर्थिकदृष्ट्या सबल व्हायची असेल तर त्यांचा शैक्षणिक विकास होणं गरजेचं आहे हे त्यांच्या लक्षात आल्यानं 1902 मध्ये आरक्षण







लागू करण्यापूर्वी त्यांनी बहुजनांच्या शिक्षण प्रक्रियेला वेग मिळण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. त्यातूनच त्यांनी सुरू केलेली वसतीगृहे आणि इतर अनेक शैक्षणिक धोरणांचा समावेश होता. त्याचा उल्लेखही या गॅझेटिअरमध्ये आहे.

आरक्षणामुळे बनले टीकेचे धनी

शाहू महाराजांनी उचलेलं हे पाऊल म्हणजे त्यावेळच्या प्रस्थापित ब्राह्मण वगार्ला त्यांच्या विरोधात असल्यासारखं वाटलं. त्यामुळं या जाहीरनाम्यावर या वगार्तून टीका झाल्याचं डॉ. जयसिंगराव पवार यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटलं आहे. त्यानुसार, प्रोफेसर विष्णू गोविंद विजापूरकर यांनी त्यांच्या समर्थ या नियतकालिकात यावर विखारी टीका केली होती. त्यांनी या जाहीरनाम्याची तुलना त्यांनी वृत्तपत्रांतील मृत्यूलेखाशी केली होती, असं जयसिंगराव पवार म्हणतात. कोल्हापूर संस्थानातील ब्राह्मणांच्या वाजवी अकांक्षांना मूठमाती मिळाल्याने या अभूतपूर्व परिपत्रकाला मृत्यूलेखाचा सन्मान देणे योग्य ठरले असते, असं त्यांनी म्हटल्याचा उल्लेख या पुस्तकात आहे. तसंच, ईश्वरानं काही भलते-सलते घडवू नये म्हणजे झाले, असा जणू शापच त्यांनी यातून दिला होता असंही जयसिंगराव पवारांनी म्हटलं आहे. लोकमान्य टिळकांच्या केसरीमध्येही यावर टीका करण्यात आल्याचा उल्लेख यात आहे. हे असमंजस्य कृत्य असून त्यांचा म्हणजे शाहू महाराजांचा बुद्धिभ्रंश झाल्याचं टिळकांनी म्हटलं होतं. तसंच मराठा या इंग्रजी वृत्तपत्रातूनही टिळकांनी टीका केली होती, असं जयसिंगराव पवार लिहितात. 50 टक्के जागा मागासवगीर्यांना राखीव करून महाराजांना आपल्या मराठा जातभाईंना कारभारात प्राधान्य द्यायचे आहे, असा आरोप टीका करताना करण्यात आल्याचं जयसिंगराव पवार यांच्या पुस्तकात म्हटलंय.

केसरी आणि समर्थ यांच्याप्रमाणेच नेटिव ओपिनियन, कल्पतरू, प्रेक्षक अशा ब्राह्मणी पत्रांनीही महाराजांच्या राखीव जागांच्या धोरणाविरोधात हल्ले चढवले होते, असाही उल्लेख यात आहे. शाहू महाराजांचा हा आरक्षणाचा निर्णय शेकडो वर्षांपासून सुरू असलेलं धर्मकारण, राजकारण, समाजकारण यातील प्रस्थापित वर्गाच्या वर्चस्वाला धक्का होता. शिक्षण आणि नोकरीबाबतची गुलामी मानसिकता महाराजांनी मोडून काढली होती, त्यामुळं महाराजांवर अशाप्रमाणात टीका झाली, असं मंजूश्री पवार म्हणाल्या.

आरक्षणाचा पहिला लाभ

शाहू महाराजांच्या शिक्षणासंदभार्तील तरतुदी आणि आरक्षणाच्या एकूणच धोरणाचा लाभ पुढं अनेकांना झाला. पण याचा लाभ होणारे पहिले व्यक्ती देशाचे ख्यातनाम कृषितज्ज्ञ दिवंगत पांडुरंग चिमणाजी पाटील-थोरात हे होते, असं इंद्रजित सावंत यांनी बीबीसीबरोबर बोलताना सांगितलं. पाटील-थोरात हे त्या काळच्या मागास मराठा समाजातील होते. शाहू महाराजांनी सुरू केलेल्या चळवळीचा लाभ त्यांना झाला असा उल्लेख शाहू महाराजांच्या पत्रांमध्येही असल्याचं सावंत सांगतात. शिक्षण घेऊन त्या जोरावर पाटील-थोरात कृषी पदवीधर झाले आणि इंग्रज सरकारमध्ये त्यांना कृषी अधिकारी म्हणून नोकरी मिळाली. त्यानंतर त्यांनी कृषीक्षेत्रात देशासाठी मोठी कामगिरी केली. शाहू महाराजांच्या या शैक्षणिक आणि आरक्षणाच्या धोरणाचा एकूणच व्यापक परिणाम झाला. कारण शाहू महाराजांनी कारभार हाती घेण्यापूर्वी नोकऱ्यांमध्ये बहुसंख्य अगदी नगण्या होतं. पण त्यांचं निधन झालं तोपर्यंत ही परिस्थिती पूर्ण बदलली होती. त्यावेळी सरकारी नोकरीमध्ये असलेले बहुसंख्य हे उच्चवर्णीय नव्हे तर बहुजन समाजातले होते आणि त्यामागं कारण होतं ते आरक्षणाचं, असं सावंत सांगतात.

महाराजांच्या हत्येचा कट?

शाहू महाराजांनी मागासलेल्या वगार्ला पुढं आणण्याठी सुरू केलेले प्रयत्न तथाकथित उच्चवर्णिय किंवा सनातनी वगार्ला रुचलेले नव्हते, त्यातून त्यांच्या हत्येच्या कटापर्यंत मजल गेली होती, असा उल्लेख महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर कोल्हापूर जिल्हा यात करण्यात आला आहे.

समाजाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये आपण निर्माण केलेल्या वर्चस्वाला धक्का लागणार अशी भीती सनातनी वगार्ला होती. त्यामुळं सूडाच्या भावनेनं पेटलेल्या एका कट्टर गटानं शाहू महाराजांचं चारित्र्य हनन करण्यास सुरुवात केली होती, असं यात म्हटलं आहे.

एकिकडं चारित्र्यहनन सुरू असताना दुसरीकडं त्यांना ठार मारण्याचे प्रयत्नही सुरू होते, असा दावाही या गॅझेटियरमध्ये करण्यात आला आहे. शाहू महाराजांच्या हत्येचा कट रचला गेला होता, या दाव्यामध्ये तथ्य असल्याचं इतिहास संशोधक डॉ. मंजूश्री पवार यांनीही सांगितलं. अभिजनांच्या वर्चस्ववादाला शाहू महाराज जो धक्का देत होते, त्याचा राग म्हणून हा प्रकार घडल्याचं मंजूश्री पवार यांनी सांगितलं आहे. 'शिवाजी क्लब'च्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले जात होते. त्यासाठी शाहू महाराज सहाय्यदेखिल करत होते. पण पुढं याच क्लबमधील काही सदस्यांनी अशाप्रकारचा कट करण्याचा प्रयत्न केल्याचंही, त्यांनी सांगितलं. शाहू महाराजांनी 1902 मध्ये लागू केलेलं आरक्षण आणि त्याचा सामाजिक समरसतेच्या दृष्टीनं झालेला फायदा निर्विवाद आहे. त्याचवेळी आज सुरू असलेला आरक्षणाचा विषय हा पूर्णपणे वेघला असल्याचं अभ्यासक सांगतात.

आजचा आरक्षणाचा विषय राजकीय वळण लागल्यानं पूर्णपणे वेगळा बनला आहे. शाहू महाराजांची आरक्षणामागे जी भावना किंवा सामाजिक दृष्टीकोन होता, तोच आज असेल असं म्हणता येणार नाही. त्यामुळं हा दोन्हीतला प्रमुख फरक असू शकतो, असं डॉ. मंजूश्री पवार म्हणाल्या. शाहू महाराजांनी आरक्षण लागू केल्यानंतर आज जवळपास सव्वाशे वर्षांचा कालावधी लोटून गेला आहे. तरीही आजही आरक्षणाच्या विषयावर अशाप्रकारचे वातावरण पाहायला मिळतं. त्यामुळं या मधल्या काळामध्ये समाज म्हणून आपण नेमकं काय केलं याचा विचार करून त्यावर ऊहापोह होणं गरजेचं असल्याचं मतही मंजूश्री पवार यांनी व्यक्त केलं. डॉ. मंजूश्री पवार शाहू महाराजांच्या आरक्षणाच्या निर्णयाचं महत्त्वं सांगताना म्हणाल्या की, ₹महात्मा फुलेंनीही आयुष्यभर अशाच प्रकारचं कार्य केलं. पण, शाहू महाराज राजे होते त्यामुळं त्याचा फायदा घेऊन त्यांनी या निर्णयाची अंमलबजावणी केली. ते पदावर नसते तर त्यांनाही हे शक्य झालं नसतं. त्यामुळं त्यांनी त्यांच्या पदाचा समाजासाठी योग्य वापर केला.₹ पुढं तोच धागा वापरून बाबासाहेब आंबेडकरांनीही हे धोरण पुढं नेलं. त्यामुळं राष्ट्रीय स्तरावर सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात दोन पावलं पुढं जाण्यात जे यश आलं त्याची बीजं शाहू महाराजांच्या या निर्णयामध्ये दिसतात, असं मंजूश्री पवार म्हणतात.



पोलीस बातमी पत्र

महामुंबई

मुंबई, मंगळवार,२८ जुलै २०२६ ते ०३ ऑगस्ट २०२६

संपादकीय

व्यवस्थेच्या विफलतेचा आक्रोश



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



लोकशाहीच्या चार स्तंभांपैकी ह्यन्यायव्यवस्थाह्ण हा सर्वात विश्वासार्ह आणि अंतिम आधार मानला जातो. मात्र, गेल्या काही काळातील घटनाक्रमांनी या स्तंभाला हादरे देण्यास सुरुवात केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात घडलेले अनुचित प्रकार, महत्त्वाच्या राजकीय खटल्यांमधील विलंब आणि न्यायव्यवस्थेबद्दलची वाढती अस्वस्थता ही लक्षणे एका मोठ्या सामाजिक संकटाची नांदी ठरत आहेत. अलीकडे दिल्लीतील सर्वोच्च न्यायालयात एका याचिकाकर्त्याने सरन्यायाधीशांविरुद्ध आक्षेपार्ह टिप्पणी करून कागदपत्रे भिरकावल्याची घटना घडली. यापूर्वी, तत्कालीन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट भिरकावल्याची घटनाही समोर आली होती. अशा घटना केवळ ह्यसुरक्षेचा प्रश्नह्ण नसून त्या संस्थेच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहेत. जेव्हा एखादा नागरिक किंवा वकील न्यायालयाच्या पावित्र्याला आव्हान देतो, तेव्हा तो केवळ त्या व्यक्तीचा अपमान करत नसतो, तर कायद्याच्या राज्याला आव्हान देत असतो. न्यायाधीशांनी अशा घटनांमध्ये संयम बाळगून कारवाई टाळणे, हा एक प्रकारे त्यांच्या उदारतेचा भाग असू शकतो, परंतु वारंवार घडणारे हे प्रकार हे दर्शवतात की, आता न्यायावर लोकांचा विश्वास राहिलेला नाही. लोक न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत, मात्र त्यांना न्याय मिळत नाही. त्या तरुणाने सर्वोच्च न्यायालयात जे काही केलं, ती सर्वसामान्य लोकांच्या मनातील भावना होती. जनतेच्या या निराशेचं परिमार्जन न्यायव्यवस्थेतील लोक कसं करतात हे पाहणं महत्त्वाचं आहे. सध्या देशातील सर्वोच्च पदांवर सुमार दजार्चे लोक बसायला लागले आहेत. यामुळे त्या पदांची प्रतिष्ठा जनतेच्या मनातून उतरत चालली आहे की काय अशी परिस्थिती आहे. हे सर्वच पदांचे आणि त्या पदावरील व्यक्तींचे सर्वसामान्यीकरण नाही. काही सन्माननीय अपवाददेखील आहेत. मात्र या सन्माननीय अपवादांनी त्यांची हुशारी, बुद्धीचातुर्य हे न्यायासाठी वापरले का, तर त्याचे उत्तर दुदैर्वाने नाही असे येते. त्यामुळे सर्वसामान्य माणसाचा न्याय आणि एकूणच व्यवस्थेवरील विश्वास उडत चालला आहे. त्यामुळे अशा घटना घडताना दिसत आहेत. यातून लोकशाहीतील मोठी तूट समोर येत आहे. न्यायालयावरील विश्वास उडत चालला आहे. दुसरीकडे, शिवसेना पक्ष आणि चिन्हाचा वाद गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित आहे. या काळात अनेक सरन्यायाधीश बदलले, पण अंतिम निकाल अद्यापही प्रक्रियेतच आहे. जेव्हा देशातील सर्वात महत्त्वाच्या राजकीय प्रकरणांचा निकाल लांबतो, तेव्हा सामान्य नागरिकाच्या मनात संशय निर्माण होतो. राजकीय पक्ष, चिन्ह आणि लोकप्रतिनिधींचे भवितव्य ठरवर्णाया खटल्यांमध्ये होणारा विलंब लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक असतो. प्रकरणांच्या विलंबामुळे समाजात असा संदेश जातो की, न्यायालय राजकीय दबावाखाली आहे किंवा त्यांना हे प्रकरण सोडवायचेच नाहीये. असे जर सातत्याने घडत राहिले तर जसे श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळमध्ये घडले तसे भारतात घडायला वेळ लागणार नाही. कारण या देशांपेक्षा वाईट परिस्थिती आपल्याकडे असल्याचे रोज निदर्शनास येते. विद्यार्थ्यांचे आंदोलन महिन्याभरापासून सुरू आहे. मनमोहन सिंगांच्या सरकारला धोरण लकवा झाल्याचे म्हणून हिणवले, मात्र त्यांनी 13 दिवसांत अण्णा हजारेंच्या उपोषणाची दखल घेतली होती. गेल्या 18 दिवसांपासून जंतरमंतरवर उपोषण सुरू आहे. त्याची साधी दखल केंद्र सरकारने घेतली नाही. राज्यात विधिमंडळ अधिवेशनादरम्यान आझाद मैदानात अनेक प्रकारची आंदोलने झाली, त्यांची साधी नोंद विधिमंडळात सत्ताधार्यांनी घेतली नाही. लोकशाहीत रुल ऑफ लॉ नावाची एक प्रक्रिया आहे. कायद्याचे, नियमांचे राज्य असावे अशी यामागची संकल्पना आहे. देशात सध्या रुल ऑफ लॉ नसून रुल बाय लॉ म्हणजे कायद्याने आम्ही तुमच्यावर राज्य करणार अशी स्थिती निर्माण केली जात आहे. कायदा पाळणं आम्हाला बंधनकारक नाही, तर कायदा आमच्या हातात आहे, कायदा तयार करणारे आम्ही आहोत, आणि त्या कायद्याच्या आधारे आम्ही तुमच्यावर राज्य करणार, अशी सध्याची परिस्थिती वाटत आहे. कायदा हे सर्वसामान्यांसाठीचे साधन होण्याऐवजी ते मोजक्या लोकांसाठी हत्यार झालेले आहे. हा असंतोष असाच वाढत गेला तर कोणती परिस्थिती ओढवेल हे आता सांगणे कठीण आहे. प्रसिद्ध न्यायमूर्ती लॉर्ड डेनिंग यांनी म्हटले होते की, न्याय हा विश्वासावर उभा असतो. जर लोक असे मानू लागले की न्यायाधीश पक्षपाती आहेत, तर तो विश्वास नष्ट होतो. सध्या नेमके तेच घडत असल्याचे दिसते. ज्ञानी असणे आणि न्यायप्रिय असणे यात फरक आहे. जेव्हा न्यायव्यवस्था केवळ कायदेशीर तांत्रिक बाबींमध्ये अडकून पडते आणि मानवी मूल्ये व सामाजिक न्यायाकडे दुर्लक्ष करते, तेव्हा लोकांच्या विश्वासाला तडा जातो. नैतिक अधःपात सगळीकडे सुरू आहे. सुशिक्षित आणि उच्च पदावर बसलेले लोक जेव्हा नियमांची पायमल्ली करतात, तेव्हा सामान्य माणूस कायद्याला घाबरणे सोडून देतो.

निकाल का लांबत आहेत, याच्या स्पष्टीकरणापेक्षा प्रक्रियात्मक गुंतागुंत जास्त दिसते. जेव्हा न्यायालये ही केवळ न्यायाची मंदिरे न राहता कायदेशीर व्यूहरचनेची मैदाने बनतात, तेव्हा सामान्य माणसाला न्याय मिळणे दुरापास्त होते. न्यायाधीशांवरील हल्ले हे व्यक्तीचा अपमान नसून व्यवस्थेच्या विफलतेचा आक्रोश आहे. ही घटनात्मक व्यवस्था वाचवायची असेल, तर फक्त पायाभूत सुविधा, इमारती किंवा कायदे पुरेसे नाहीत, तर न्यायाधीशांमध्ये करुणा, स्पष्टवक्तेपणा आणि वेळेत निर्णय घेण्याची धमक असणे आवश्यक आहे. ज्या दिवशी सामान्यांचा कायद्यावरचा विश्वास पूर्णपणे उडेल, त्या दिवशी लोकशाहीने व्यवस्थित घातलेली घडी विस्कटून जाईल. लोकशाहीच्या मूल्यांना तडे गेल्याशिवाय राहणार नाहीत. न्यायव्यवस्था ही केवळ कागदावरची यंत्रणा नसून ती जनमानसातील विश्वासावर उभी आहे, हा विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे हेच आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे.

आक्रोश आणि दडपशाही



ह्यजंतर मंतरह्ण येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आंदोलनाची स्वतंत्र चूल मांडल्यामुळे विरोधकांच्या गोटात परस्परविरोधी पडसाद उमटले असले, तरी विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठबळ देतानाच पुन्हा या आंदोलनाच्या केंद्रस्थानी येण्यात काँग्रेसने यश मिळवले, हे मान्य करावे लागेल. वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील (नीट) गैरप्रकारांच्या विरोधातातील विद्यार्थ्यांच्या मोर्चावरील लाठीमाराची दृश्ये पाहून कोट्यवधी घरांतील विद्यार्थी आणि त्यांचे आई-बाप नक्कीच कळवळले असतील. राजधानी दिल्लीने आजवर शेकडो आंदोलने-मोर्चे-निदर्शने पाहिली आहेत; मात्र पारदर्शक परीक्षापद्धतीच्या साध्या मागणीसाठी आक्रोश करणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींना अशा पद्धतीने काठ्यांच्या फटक्यांनी जायबंदी करण्यातून व्यवस्थेच्या अमानवी चेहेऱ्याचे दर्शन घडले, एवढे मात्र खरे. दुसऱ्या दिवशी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी अचानक धडक मारली. त्यानंतर मात्र या आंदोलनाची दखल घेतल्याशिवाय सरकारपुढे पर्याय राहिलेला नाही. गेले २२ दिवस सुरू असलेल्या आंदोलनाकडे झालेला काणाडोळा आणि नंतर दिल्ली पोलिसांच्या अगोचरपणामुळे सरकारवर ही वेळ आली. ह्यनीटह्णमधील पेपरफुटीच्या विरोधात ह्यकॉक्रोचह्ण जनता पक्षाह्णने पुकारलेल्या आंदोलनात बेमुदत उपोषणाला बसलेले पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना ह्यजंतर मंतरह्णयेथून हटवल्यानंतर ह्यसीजेपीह्णच्या वतीने संसद भवनावर काढलेल्या मोचार्साठी मोठ्या संख्येने विद्यार्थी जमा झाले होते. त्या मोर्चात वेगवेगळ्या ठिकाणी पोलिसांनी लाठीमार केला आणि अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या. त्यामध्ये ६५ विद्यार्थी जखमी झाले असून, काहींची प्रकृती गंभीर आहे. या वेळी पोलिसांवर दगडफेक केल्याचीही काही दृश्ये पाहावयास मिळाली. दोन्ही बाजूंनी याविषयी उलटसुलट माहिती देण्यात येते. ह्यदगड भरलेल्या पिशव्या असलेल्या काही मोटारींबाबत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना माहिती दिली होती,ह्ण असे ह्यसीजेपीह्णचे नेते सांगतात. त्यामुळे या आंदोलनात कोणी समाजकंटक शिरले असतीलच, तर त्यांची कसून चौकशी झाली पाहिजे. मुळात गेले २२ दिवस शांततामय मागार्ने गाऱ्हाणे मांडणाऱ्या या विद्यार्थ्यांची वेळीच दखल घेतली असती, तर दिल्लीतला गोंधळ नक्कीच टाळता आला असता. मात्र, कोणी मागितला म्हणून राजीनामा वगैरे देण्यासारखे विचार या सरकारच्या मनाला शिवतही नसतात आणि मागण्यांवर चर्चा करण्यापेक्षा ह्यझुकेगा नही,ह्ण ही प्रतिमा जपण्यास सध्या सर्वाधिक महत्त्व आहे, हे अननुभवी विद्यार्थ्यांनी कदाचित लक्षात घेतले नसावे! प्रत्यक्ष मोर्चामधील परिस्थितीच्या हाताळणीबाबत अननुभवी विद्यार्थी नेत्यांइतकाच दोष दिल्ली पोलिसांकडेही जातो. मुला-मुलींवर केलेल्या निर्दयी लाठीमारानंतरही ह्यहे आंदोलन व्यावसायिकरीत्या हाताळले,ह्ण हा पोलिसांचा दावा निव्वळ हास्यास्पद आहे. यापूवीर्ही दिल्लीतील विद्यापीठात कथित देशविरोधी घोषणांप्रकरणी अद्यापही आरोपपत्र दाखल करण्यात आलेले अपयश आणि विविध विद्यापीठांच्या आवारात शिरून विद्यार्थ्यांवर केलेल्या लाठीमाराच्या घटना दिल्ली पोलिसांच्या ह्यव्यावसायिक हाताळणीह्णचे पितळ उघडे पाडण्यास पुरेशा आहेत. आजवर विद्यार्थिकेंद्री असलेल्या या आंदोलनाला आता उघड राजकीय वळण लागले आहे. एकीकडे ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह त्यांच्या पक्षाच्या सर्व खासदारांनी ह्यजंतर मंतरह्ण येथे जाऊन ह्यसीजेपीह्णच्या आंदोलकांची विचारपूस केली. मात्र, तेथे न जाता काँग्रेसने थेट पंतप्रधानांच्या निवासस्थानी हल्लाबोल केला आणि या विषयाचा प्रकाशझोत आपल्याकडे वळवून घेतला. त्यामुळे संसदेमध्ये चर्चा होऊन या आंदोलनाची कोंडी फुटेलही; त्यातून विद्यार्थीवर्गाच्या हाती भरीव काही लागावे, ही अपेक्षा आहे. मात्र, या आंदोलन-प्रतिआंदोलनांमुळे विरोधकांच्या गोटात वेगळेच महाभारत सुरू झाले आहे. पंतप्रधान आणि काँग्रेस यांच्यात ह्यछुपा समझोताह्ण झाल्याचा आरोप करणारे अरविंद केजरीवाल यांना त्यातून मिरच्या झोंबल्याचे दिसून येते. या आंदोलनांवर सत्ताधारी नेते ह्याराजकीय ब्लॅकमेलिंगह्णचा आरोप करीत आहेत; महाराष्ट्रातील काही नेते विद्यार्थ्यांना ह्यदहशतवादीह्ण संबोधून राजापेक्षा राजनिष्ठ असल्याचा आव आणत आहेत. मात्र, आज सत्तापदांवरील अनेक जण विद्यार्थी आंदोलनातूनच पुढे आले आहेत; किमान त्यांना तरी विद्यार्थ्यांच्या भावनांची दखल घ्यावी, असे वाटत नसेल का?

डोळे, कान, तोंड बंद



संसद भवनावरील सीजेपीच्या आंदोलनाकडे भाजपकडून सपशेल दुर्लक्ष. महात्मा गांधीजींविषयी बोलताना त्यांच्या तीन माकडांचा नेहमी उल्लेख होतो. वाईट पाहू नका, वाईट ऐकू नका आणि वाईट बोलू नका, अशी प्रतिके यात आहेत. म्हणजे एक माकड डोळे बंद करून, दुसरा माकड कानावर हात आणि तिर्सया माकडाने तोंड बंद केलेले दिसते. याचा अर्थ असा की आपण नेहमी चांगले पाहावे, चांगले ऐकावे आणि चांगलेच बोलावे! मात्र, दोन दिवस मागे गेलो तर चलो संसद मार्चमध्ये 20 जुलै रोजी जे घडले ते ना पाहण्यासारखे होते, ना ऐकण्यासारखे होते ना बोलण्यासारखे राहिले आहे. विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला, अनेक विद्यार्थी जबर जखमी झाले. यात तरुणींनाही जबर मारहाण झाली आहे. समाज माध्यमांवर याचे भयानक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. हे पाहून दगडालाही पाझर फुटेल, मात्र सरकार ढिम्म आहे. 20 दिवस जंतरमंतरवर कॉक्रोच जनता पाटीर्चे आंदोलक आणि सोनम वागंचुक यांचे उपोषण सुरू होते. या 20 दिवसांत सरकारला त्यांच्याशी चर्चा करावीशी वाटली नाही. हे विद्यार्थी भारतीय आहेत, नीट पेपरफुटीप्रकरणी ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मागत आहेत. नीट पेपरफुटीमुळे 22 विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. याची सरकारला अजिबात जाणीव नाही.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी संसदेबाहेर विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असताना धर्मेंद्र प्रधान हसत बाहेर पडतानाचे दृष्ट जाणिवा असलेल्या सर्वांची चिंता वाढवणारे होते. म्हणूनच गांधीजींच्या तीन माकडांची प्रकर्षाने आठवण होत आहे. सरकार कुणाचे ऐकायला तयार नाही, काय सुरू आहे हे बघायला तयार नाही आणि संवादाची तयारी तर अजिबात नाही. ह्यमन की बातह्णमध्ये पंतप्रधान एकतर्फी बोलतात, परीक्षा पे चर्चा म्हणतात मात्र, तेच विद्यार्थी 20 दिवस आंदोलन करत असताना त्यांची साधी दखल घेण्याचेही सौजन्य दाखवत नाहीत. त्यातही चर्चा आणि संवाद या शब्दांशीही सरकारची तोंडओळख नाही. अशातच बुधवारी सरकारकडून किरण रिजीजू यांनी लोकसभेत सांगितले की सरकार आधीपासूनच चचेर्ला तयार होते. मग प्रश्न उपस्थित होतो की, 20 दिवसांत सरकारचा एकही प्रतिनिधी जंतरमंतरवर चचेर्साठी का गेला नाही? सोमवारी विद्यार्थ्यांनी संसदेवर मार्च सुरू केल्यानंतर त्यांना चचेर्साठी बोलावण्यात आले होते. त्यावेळीही कॉक्रोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांना जेपी नड्डा यांनी दोन तास ताटकळत ठेवून 10 मिनिटांची भेट घेतली होती. हे कमी म्हणून की काय हे राजकीय आंदोलन आहे, हे आंदोलन म्हणजे नौटंकी आहे, या आंदोलनामागे परकीय शक्ती आहे, असे आरोप सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून वारंवार केले जात होते. गंभीर बाब म्हणजे जंतरमंतरजवळ दगड भरलेले ट्रक कुठून आले, याचे उत्तर सरकार आणि दिल्ली पोलीस देऊ शकलेले नाहीत. यात एक बाब लक्षात घ्यावी लागले की हे ट्रक इथे कुणी आणले, हा सवाल विद्यार्थ्यांनी प्रथम केला होता. त्याचा व्हिडिओ अभिजीत दीपके यांनी समाज माध्यमांवर शेअर केला होता. त्यामुळे उपोषणस्थळाजवळ दगडाचा ट्रक उभा करून आंदोलकांच्या हाती सहज दगड पोहोचवण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केल्याचे सहज दिसते. चलो संसद मार्चनंतर दुर्सयाच दिवशी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन करत धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी केली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माफी मागावी, असा आग्रह धरला. हीच मागणी त्यांनी बुधवारीही केली. मुद्दा हाच आहे की सरकार विद्यार्थ्यांचा अंत का पाहत आहे? विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले तेव्हाच सरकारने संवाद साधला असता तर प्रकरण चिघळले नसते आणि विरोधकांच्या हातीही आयते कोलीत मिळाले नसते. लोकशाहीमध्ये संवादाला खूप महत्त्व असते. प्रत्यक्षात आपण म्हणू तीच पूर्व दिशा हेच सरकारने ठरवले आहे. म्हणूनच सरकारवर टीका करणारे देशद्रोही, त्यांच्या मागे परकीय हात असले बेछूट आरोप केले जातात. आता जंतरमंतरवरील आंदोलन चिघळत आहे. काँग्रेसदेखील आक्रमक होत आहे. दोन्ही बाजूंनी आंदोलनाचा जोर वाढत असूनही सरकार कुठलीही जबाबदारी घ्यायला तयार नाही. देशात आंदोलने होत आहेत. मुंबईत शिवाजी पार्कवर सलग तिर्सया दिवशी हजारोंच्या संख्येने विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. सरकारविरोधी वातावरण तापत आहे. यानंतरही धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा सरकार घेईल, असे वाटण्याचे कारण नाही. तसे झाल्यास त्यावर मोदी सरकारचा पराभव असा शिक्का बसेल. आणि सरकारला हे चालणार नाही. त्यामुळे आंदोलनात फूट पाडता येईल का किंवा त्यांना राजकीय पक्षाचे लेबल लावून बदनाम करता येईल का, असे प्रयत्न केले जातील. यासाठी शेतकरी आंदोलनाचे दिवस आठवले तरी खूप गोष्टी लक्षात येतील. एक वषार्हून अधिक काळ दिल्लीच्या सीमेवर पंजाबसह देशातील हजारो शेतर्कयांनी ऊन, वारा, पाऊस आणि थंडीत आंदोलन केले. तेव्हा त्यांची दहशतवादी अशी हेटाळणी करण्यात आली. मात्र, आंदोलन थांबले नाही. नंतर पंजाबची निवडणूक पाहून सरकारने शेतकरीविरोधी तीन काळे कायदे रद्द केले होते. शेतकरी आंदोलनकर्त्यांना सरकारने जी वागणूक दिली तशीच वागणूक आंदोलन करर्णाया विद्यार्थ्यांना दिल्यास आश्चर्य वाटू नये, शिवाय विद्यार्थ्यांवर दहशतवादी असल्याचा आरोप होऊ लागला आहे. राहुल गांधी अराजकता पसरवत असल्याचे आरोप करत आता भाजपने आंदोलनाला सुरुवात केली आहे. त्यामुळे सरकार डोळे, कान, तोंड बंद करून बसले आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,२८ जुलै २०२६ ते ०३ ऑगस्ट २०२६

रक्त केंद्रांवर आरोग्य विभागाची नजर

2 वैद्यकीय अधिकाऱ्यांसह 3 जणांचे पथक, धडक तपासणी मोहीम राबवणार

मुंबई। राज्यातील रक्तसाठा व्यवस्थापन अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्य रक्त संक्रमण परिषदेतर्फे राज्यभरातील रक्त केंद्रांवर धडक अचानक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. यासाठी दोन वैद्यकीय अधिकारी व एक वित्त विभागातील अधिकारी अशा तीन जणांचे पथक सरप्राइज व्हिझिट करत तपासणी करणार असल्याचे राज्य रक्त संक्रमण परिषदेने सांगितले. राज्य रक्त संक्रमण परिषदेने २७ जून २०२६ रोजी जारी केलेल्या निदेर्शानुसार ही विशेष अचानक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनियम, १९४० तसेच त्याअंतर्गत असलेल्या नियमांनुसार रक्त हे औषध म्हणून वर्गीकृत असल्याने त्याचे संकलन, प्रक्रिया, साठवण आणि वितरणामध्ये उच्च दजार्ची गुणवत्ता, सुरक्षितता आणि पारदर्शकता राखणे बंधनकारक आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या अलीकडील तपासण्यांमध्ये काही रक्तकेंद्रांमध्ये गंभीर त्रुटी निदर्शनास आल्याने राज्य रक्त संक्रमण परिषदेने ही विशेष मोहीम हाती घेतली आहे. तपासणीदरम्यान रक्त केंद्रांच्या कार्यपद्धतीची सखोल पडताळणी करण्यात येत आहे नियमीतपणे ही तपासणी पुढेही सुरू राहील. रक्त संकलनाची गरज आणि प्रत्यक्ष संकलन, रक्तघटकांचे इतर राज्यांमध्ये होणारे हस्तांतरण, प्लाज्मा फ्रॅक्शनेटर्सना पुरवठा, राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन, ई-रक्तकोष प्रणालीवरील रक्तसाठ्याची अद्ययावत नोंद, रक्त व रक्तघटकांच्या प्रक्रिया शुल्काची माहिती दर्शविणारे फलक, तांत्रिकदृष्ट्या पात्र मनुष्यबळाची उपलब्धता, रक्तसाठ्याचे अंकेक्षण, रक्तपिशव्यांचा वापर व नोंदी, तसेच रक्तकेंद्रात प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद आणि त्यावरील कार्यवाही अशा विविध मुद्दयांची तपशीलवार तपासणी आरोग्य विभागामार्फत करण्यात येणार आहे. राज्य रक्त संक्रमण परिषदेने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक रक्त केंद्रातील सेवा गुणवत्ता, रक्तसाठा व्यवस्थापन, आवश्यक नोंदी आणि नियमांचे पालन याची बारकाईने पडताळणी करण्यात येत आहे. संबंधित पथकांना तपासणीनंतरचा सविस्तर अहवाल राज्य रक्त संक्रमण परिषद तसेच अन्न व औषध प्रशासनाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मोहीम सुरूच राहणार! या तपासणी मोहिमेत ज्या रक्तकेंद्रांमध्ये नियमांचे उल्लंघन, अनियमितता किंवा गंभीर त्रुटी आढळतील, त्यांच्याविरुद्ध नियमानुसार कठोर प्रशासकीय कारवाई शासनाच्या वतीने करण्यात येणार आहे.

काही सेकंदांत मैत्रीचा खेळ खल्लास! मुंडकं उडवलं, हात छाटले; दोन मित्रांनीच केला जीवाभावाच्या मित्राचा गेम

मुंब्रा। ठाण्यातील मुंब्रा येथे मैत्रीचे नाते रक्तरंजीत वैरात बदलल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका तरुणाची अत्यंत निर्घृणपणे हत्या करून त्याचे शीर आणि दोन्ही हात धडापासून वेगळे करण्यात आल्याने ठाणे शहरात खळबळ उडाली आहे. ठाणे गुन्हे शाखेच्या युनिट-4 ने या सनसनाटी हत्येचा छडा लावत दोन आरोपींना अटक केली असून मृताचे शीर आणि हत्येत वापरलेले शस्त्र शोधण्याचे काम सुरू केले आहे.



ठाणे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खर्डी गावाजवळील निर्जन परिसरात एका तरुणाचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. मृतदेहाचे शीर आणि दोन्ही हात धडापासून वेगळे करण्यात आल्याने पोलिसांसमोर मृताची ओळख पटवण्याचे मोठे आव्हान होते. तपासादरम्यान फैज सुलतान मलिक आणि अल्बान सुलतान मलिक या दोघांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी आपलाच मित्र अमन मुस्कीन शेख याची हत्या केल्याची कबुली दिली.

पोलिसांच्या तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, मार्च रोजी रात्री मुंब्यार्तील खड्डी गावंपरिसरात झालेल्या वादानंतर आरोपींनी अमनला रिक्षामधून निर्जन ठिकाणी नेले. तेथे धारदार शस्त्राने त्याचा गळा चिरून हत्या केली. त्यानंतर मृताची ओळख लपवण्यासाठी त्याचे शीर आणि दोन्ही हात वेगळे करून मृतदेह जंगलात फेकून दिला.या प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासादरम्यान आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. आरोपींनी संपूर्ण हत्याकांडाचा व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून ठेवला होता. पोलिसांनी तो मोबाईल जप्त केला असून, व्हिडिओची फॉरेन्सिक तपासणी सुरू आहे. खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल मुख्य आरोपी फैज सुलतान मलिक याच्यावर यापूवीर्ही खुनासह अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. तर मृत अमन शेख याच्यावरही दुचाकी चोरीचा गुन्हा नोंद होता. सध्या पोलिसांकडून मृताचे शीर आणि हत्येत वापरलेले शस्त्र शोधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अमन शेख आणि फैज मलिकमध्ये बाचाबाची का झाली? तू मोठा भाई की मी मोठा भाई यावरुन दोन मित्र अमन शेख आणि फैज मलिकमध्ये बाचाबाची झाली आणि आरोपी फैजने त्याच्या जवळ असलेल्या चाकून अमनच्या गळ्यावर वार केला. त्यात तो मृत्यू पावला त्यानंतर त्याचा मृतदेह सापडू नये याकरता धड वेगळे केले आणि शरीराचे तुकडे करुन वेगवेगळ्या ठिकाणी फेकले. मयत अमन शेख आणि आरोपी फैज मलिक अट्टल गुन्हेगार आहेत. अमन शेखवर चोरी मारामारीसारखे गुन्हे दाखल आहेत तर फैदवर हत्या अपहरणसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

वाढत्या वीज मागणीचा ताण कमी करण्यासाठी महावितरणची मोठी तयारी वसई-विरारमध्ये पाच नवीन उपकेंद्रे उभारणार



वसई। वसई-विरार शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रांवर वाढत्या भाराचा परिणाम दिसू लागला असून भविष्यात अखंड आणि दजेर्दार वीजपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने शहरात पाच नवीन 22/22 केंव्ही क्षमतेची उपकेंद्रे उभारण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. वसई-विरार शहरात गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. नव्या गृहसंकुलांसोबतच व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्राचाही वेगाने विस्तार होत असल्याने विजेच्या वापरात सातत्याने वाढ होत आहे. या वाढत्या मागणीमुळे सध्या कार्यरत असलेल्या वीज उपकेंद्रांवर अतिरिक्त भार पडत असून काही ठिकाणी तांत्रिक अडचणी निर्माण होऊन वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत.

सध्या वसई-विरार विभागात सुमारे 10 लाख 62 हजार वीज ग्राहक आहेत. यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक, कृषी, पथदिवे तसेच पाणीपुरवठा यांसारख्या विविध प्रकारच्या ग्राहकांचा समावेश आहे. या सर्व ग्राहकांना वर्षभरात साधारण तीन ते साडेतीन हजार मिलियन युनिट्स इतका वीजपुरवठा केला जातो. मात्र दरवर्षी सरासरी 10 ते 12 टक्क्यांनी ग्राहकसंख्या वाढत असल्याने विद्यमान यंत्रणेवर ताण वाढू लागला आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन महावितरणने शहरात आणखी पाच नवीन 22/22 केव्ही क्षमतेची उपकेंद्रे उभारण्याची योजना आखली आहे. ही उपकेंद्रे विरार पश्चिम (एचडीआयएल), विरार पूर्व (कण्हेर), मनवेलपाडा, वसई फाटा आणि पेल्हार या भागात प्रस्तावित करण्यात आली आहेत. या प्रस्तावाला वरिष्ठ स्तरावर मंजुरी मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती महावितरणचे अधीक्षक अभियंता माणिक राठोड यांनी दिली.

सध्या शहरात महावितरणची 29 उपकेंद्रे कार्यरत असून त्यामार्फत संपूर्ण परिसराला वीजपुरवठा केला जातो. मात्र वाढत्या ग्राहकसंख्येमुळे या उपकेंद्रांवर अतिरिक्त भार पडत असल्याने नवीन उपकेंद्रे उभारणे आवश्यक बनले आहे. ही केंद्रे कार्यान्वित झाल्यानंतर वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होईल आणि तांत्रिक बिघाडाचे प्रमाणही कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, शहरात वीज वितरणासाठी 6 हजार 22 रोहित्रे कार्यरत आहेत. काही भागांमध्ये या रोहित्रांवरही मोठ्या प्रमाणात भार पडत असल्याने वारंवार तांत्रिक बिघाड होत आहेत. विशेषतः यंदाच्या उन्हाळ्यात वाढलेल्या वीज वापरामुळे अनेक ट्रान्सफॉर्मरमध्ये बिघाड आणि फुटण्याच्या घटना घडल्या होत्या. तसेच अलीकडील पुरस्थितीत 62 रोहित्रे बंद पडली होती. त्यानंतर महावितरणने तातडीने 80 नवीन रोहित्रे उपलब्ध करून निम्म्याहून अधिक खराब रोहित्रे बदलण्याचे काम पूर्ण केले आहे. महावितरणच्या या नियोजनामुळे येत्या काळात वसई-विरारमधील वाढत्या वीज मागणीला अधिक सक्षमपणे प्रतिसाद देता येणार असून नागरिकांना अधिक विश्वासार्ह आणि सुरळीत वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

संतांचे पालखी सोहळे पंढरपुरात दाखल... ज्ञानेश्वर माऊली आणि सोपान काका बंधू भेटीचा अपूर्व सोहळा

सोलापूर। संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यांसह अन्य संतांच्या पालख्यांनी बुधवारी पंढरपूर तालुक्यात प्रवेश केला. दसुर जवळ मावळतीला पावसाच्या सरी झेलत माऊली व संत सोपान काका यांच्या बंधू भेटीचा अपूर्व सोहळा पार पडला. दरम्यान राज्यभरातून आषाढी सोहळ्यासाठी येत असलेले पालखी सोहळे व दिंड्या या पंढरपूर तालुक्यात दाखल झाल्या आहेत. वेळापूरचा मुक्काम आटोपून संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी भंडीशेगाव मुक्कामासाठी पंढरपूर तालुक्यात पोहोचली. वाटेत माळशिरस तालुक्यातील ठाकूरबुवांच्या समाधी जवळ मोठ्या भक्तीमय वातावरणात गोल रिंगण झाले. तर पिराची कुरोली येथील टप्पा परिसरातील दसुर पाटीजवळ सासवड येथून आलेल्या संत सोपानदेव यांच्या पालखी सोहळ्याची भेट माऊलींच्या पालखीसोबत झाली. हा बंधू भेटीचा सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. त्यापूर्वी दुपारी संत सोपान देव, संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर माऊलींचा पालखी सोहळा बोंडले येथून दसुरकडे मार्गस्थ झाला होता.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१०३५//२६-२७

दिनांक :- २१/०७/२०२६

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्रमांक.	रिसीट नं	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-७	NL३०/३२२/४१	३८३९५	निता चिमाजी मोरे	संजना संजय मंहाडीक
२	निळेमोरे-७	NL३०/३०१/२०	३८३८६	रवि वसंत शेट्टी/आशा वसंत शेट्टी	देव्यांशी दिपक शिगवन
३	निळेमोरे-७	NL३०/३४४/१०	३८३९३	सिध्दीविनायक डेव्ह.	सतीश गोविंद साखरे/सुनंदा गोविंद साखरे
४	निळेमोरे-७	NL३०/३४४/३०	३९७१०	गंगाधर काशीराम भंबिड	परेश दत्ताराम दुर्गवले
५	निळेमोरे-७	NL३०/१६०/५	३९१११	एम एम सावजी	पुष्पा हिराराम चोधरी
६	निळेमोरे-७	NL३०/३९४/४५	३९६०	मोहम्मद अतिक उस्मागणी चौहान	अंसारी मोहम्मद हुसैन मोहम्मद दाऊद
७	निळेमोरे-७	NL३०/३६२/३४	३९७३१	एस एच इंटरप्रायजेस	अर्चना श्यामसुंदर धुरीया
८	निळेमोरे-७	NL३०/१८९/२२	३९८५०	स्मिता संतोष शिरोळककर	प्रणव शंकर शिरोळकर
९	निळेमोरे-७	NL३०/३४६/१४३	४०४०४	वामण तामणकर	विकी प्रकाश सावर्डेकर/पुजा विकी सावर्डेकर
१०	निळेमोरे-७	NL३०/४१०/१०२	३९९२३	ओम साई डेव्ह.	संदेश बी ठुकरुल/मृणाली संदेश टुकरुल
११	निळेमोरे-७	NL३०/४०९/५१	३९२४२	ओम दत्तगुरु डेव्ह.	संतोषी गोपीचंद बिर्जे
१२	निळेमोरे-७	NL३०/४१३/१०	३९१४८	भक्ती इंटरप्रायजेस	चंदु भागोजी कारंडे/सुर्वणा चंदु कारंडे
१३	निळेमोरे-७	NL३०/४१३/१५	३८९८५	भक्ती इंटरप्रायजेस	लल्लुराम तिलश्वरनाथ गुप्ता
१४	निळेमोरे-७	NL३०/४१२/४३	३९८६७	किशोरी दिलीप चव्हाण	किशोरी अक्षय चव्हाण/अक्षय सुभाष चव्हाण
१५	निळेमोरे-७	NL३०/२८०/२६	३९८६८	रश्मी पाटील/सुशांत पाटील	करण इंद्रबहादूर थापा/लक्ष्मी करण थापा
१६	निळेमोरे-७	NL३०/३७६/४१	४०४०२	प्रविण टी पवार	समर संतरा व प्रीया संतरा
१७	निळेमोरे-७	NL३०/३९८/२५	४०५/६५	सचिन घनश्याम रस्तोगी	आरती दिपक रस्तोगी
१८	निळेमोरे-७	NL३०/२६८/१६	-	दुर्गीक फ्रान्सीस मिनेन / सातु	गोरव बाजीराव कागणे/तान्हाबाई बाजीराव
१९	निळेमोरे-७	NL३०/२५३/१३	४००२६	लक्ष्मण कृपा नाईक	अल्पेश शंकर ताबडे/दिक्षीत अल्पेश ताबडे
२०	निळेमोरे-७	NL३०/३५२/५	३९०१५	किमया केतन परब	संदिप कैलास गिरी

सही

(मेधा वर्तक)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com